# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 04 January 2026

## Time 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०४ जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता

****

राज्यात २९ महापालिकांच्या निवडणुकीच्या प्रचारानं गती घेण्यास सुरुवात केली आहे. विविध पक्षांच्या उमेदवारांकडून वैयक्तिक भेटीगाठींद्वारे तसंच प्रचार सभांद्वारे प्रचार सुरू झाला आहे. अंतिम उमेदवार यादीनुसार २ हजार ८६९ प्रभागांमधून १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहेत.

एकंदर प्राप्त ३३ हजार ४२७ अर्जांमधून २४ हजार ७७१ अर्ज वैध ठरले. तर, ८ हजार ८४० उमेदवारांनी अर्ज मागे घेतले.

राज्यात सर्वाधिक सतराशे उमेदवार मुंबई महापालिका निवडणुकीत, तर सर्वात कमी २३० उमेदवार इचलकरंजी महापालिकेची निवडणूक लढवत आहेत. यात,छत्रपती संभाजीनगर २९ प्रभाग ११५ सदस्य आणि ८५९ उमेदवार,लातूरच्या १८ प्रभाग ७० सदस्य ३५९ उमेदवार.परभणी १६ प्रभाग ६५ सदस्य ४११ उमेदवार,नांदेड-वाघाळा २० प्रभाग ८१ सदस्य ४९१ उमेदवार,यासह जालन्यात १६ प्रभागांसाठीच्या ६५ सदस्यांसाठी ४५३ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. येत्या १५ जानेवारीला मतदान आणि दुस-या दिवशी मतमोजणी होणार आहे. यंदाच्या निवडणुकीत अनेक उमेदवार बिनविरोध निवडून आल्याच्या मुद्द्यावरून राजकीय पक्षांमध्ये आरोप प्रत्यारोप सुरू आहेत.

***

जळगाव इथं काल,शहराच्या विकासासंदर्भात एक चर्चासत्रं घेण्यात आल्याचं असा आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

सर्वसामान्य जळगावकर, आर्किटेक्ट, उद्योजक, क्रीडा प्रशिक्षक, माहिती अधिकार कार्यकर्ते यांनी याबाबत कोणते प्रयत्न व्हावेत, याबाबत आपली मतं मांडली. जळगावातून मोठ्या प्रमाणात मुंबई-पुण्याकडे होणारं तरुण पिढीचं स्थलांतर रोखण्यासाठी जळगावला स्मार्ट सिटी करण्याचं नियोजन करावं, शहर विकासासाठी

सर्व पक्षांनी एकत्र यावं,यासाठी जळगावकरांनी पाठपुरावा करावा अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.  चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी असलेल्या जैन समुहाचे अध्यक्ष अशोक जैन यांनी बोलतांना गेल्या  २४ वर्षात जळगावात ठोस काम न झाल्याबद्दल खंत व्यक्त करत आता या महापालिकेसाठी आयुक्त म्हणून आय.ए.एस. अधिकारीच हवा असा ते म्हणाले.

***

सातारा इथं आयोजित तीन दिवसीय, ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा आज दुपारी साडेचार वाजता समारोप होत आहे. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त गुजराती भाषेतील ज्येष्ठ साहित्यिक रघुवीर चौधरी,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांसह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित असणार आहेत. आज दिवसभरात संमेलनात,पुस्तक चर्चा,मुलाखत,कविसंमेलन,परिसंवाद आणि रात्री सांस्कृतिक कार्यक्रमही होणार आहे .

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असलेल्या परिक्षा पे चर्चा या राष्ट्रीय संवादाच्या नवव्या भागात  सहभागी होण्यासाठी इयत्ता ६ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थी, त्यांचे पालक आणि शिक्षक पात्र आहेत.संबंधीतांनी यात सहभागी होण्यासाठी माय जी ओ व्ही संकेतस्थावर नोंदणी करण्याचं आवाहन केंद्र सरकारतर्फे  सामाजिक संपर्क माधमांवर करण्यात आलं आहे.

***

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर वंदे भारत शयनयान रेल्वेची पाहणी केली. पहिली वंदे भारत शयनयान रेल्वे आसाममधील गुवाहाटी आणि पश्चिम बंगालमधील हावडा दरम्यान धावणार असून, देशातील दीर्घ अंतराच्या रात्रकालीन रेल्वे प्रवासात हा एक परिवर्तनकारी टप्पा ठरणार आहे. प्रती तास 180 किमी पर्यंत वेग असलेली ही अर्ध-उच्चगती रेल्वे आधुनिक सुविधा आणि जलद प्रवास वेळ यांचे संयोजन सादर करते. या रेल्वेच्या चाचण्या, परीक्षणे आणि प्रमाणनाची संपूर्ण प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते याच महिन्यात या रेल्वेला हिरवा झेंडा दाखवण्यात येणार आहे.

****

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं, सूर्यप्रकाशयुक्त राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.तर,छत्रपती संभजीनगर शहर परिसरात आज सकाळपासूनच काही अंशी आर्दतेसह तापमान वाढल्याचं जाणवत असून ढगाळ वातावरण आहे.

***

भंडारा जिल्ह्यातल्या चांदपूरच्या  हनुमान देवस्थान परिसरात काल एक मोटार अनियंत्रित वेगामुळे तलावात बुडाली, मात्र पोलिस आणि स्थानिकांच्या सतर्कतेमुळे त्यातील दोघांना तातडीनं वाचवण्यात आलं.दर्शनासाठी आलेली दोन जण बसलेली ही गाडी मागे घेतांना चालकाचं अनियंत्रित वेगामुळं संतुलन बिघडून मोटार तिथल्या तलावात पडली. मात्र,पोलिस आणि स्थानिकांनी  तत्काळ तलावात उडी मारून चालकासह  त्याच्या मुलाला सुखरूप बाहेर काढलं.

****